INTERNATIONAL RESEARCH JOURNAL OF HUMANITIES AND INTERDISCIPLINARY STUDIES
( Peer-reviewed, Refereed, Indexed & Open Access Journal )
DOI : 03.2021-11278686 ISSN : 2582-8568 IMPACT FACTOR : 8.031 (SJIF 2025)

# विद्यार्थ्यांच्या विविध व्यावसायिक पदवी अभ्यासक्रम निवडीमागील कारणाचा अभ्यास

## (Study on the Reasons Behind Students' Choice of Various Professional Degree Courses)

**डॉ. तुषार मधुकर माळी**
सहायक प्राध्यापक,
आर. सी. पटेल शिक्षणशास्त्र महाविद्यालय,
शिरपूर, जि. धुळे (महाराष्ट्र, भारत)

**DOI No.** 03.2021-11278686 **DOI Link ::** https://doi-ds.org/doilink/10.2025-36347773/IRJHIS2510018

***सारांश:***

*प्रस्तुत संशोधनात, विद्यार्थ्यांच्या विविध व्यावसायिक पदवी अभ्यासक्रम निवडीमागील कारणाचा अभ्यास वर्णनात्मक संशोधन पद्धतीतील सर्वेक्षण पद्धतीने करण्यात आला आहे. शिरपूर तालुक्यातील सर्व व्यावसायिक अभ्यासकमाला प्रवेशित विद्यार्थ्यांची जनसंख्या म्हणून निश्चिती करण्यात आली होती. माहितीचे संकलन करण्यासाठी संशोधकांनी काही विधानाची स्वनिर्मित प्रश्नांवली व्यावसायिक अभ्यासकमाला प्रवेशित विद्यार्थ्यांच्या प्रवेशित गटाला देण्यात आली होती. प्रतिसाद नोंदविणारे एकूण 227 विद्यार्थी होते. तेच विद्यार्थी संशोधनासाठी नमुना म्हणून निवड करण्यात आले होते. संकलित माहितीचे विश्लेषण करण्यासाठी टक्केवारी या संख्याशास्त्रीय परिमाणांचा अवलंब केला आहे.*

*निष्कर्ष: विद्यार्थ्यांच्या अभ्यासक्रम निवडीवर स्वतःची आवड आणि स्वयंपर निर्णय सर्वात प्रभावी घटक आहेत, परंतु पालकांचा सल्ला आणि शाळेतील करिअर मार्गदर्शन यांचाही महत्त्वाचा वाटा आहे. जवळपास 50% विद्यार्थी भविष्यात अभ्यासक्रम बदलण्यास तयार आहेत. फक्त 37% विद्यार्थीच आपल्या सध्याच्या अभ्यासक्रमाबाबत निश्चित आणि समाधानी आहेत, तर उर्वरित विद्यार्थ्यांपैकी काही अजूनही निर्णय घेण्यात असमर्थ आहेत.*

**प्रस्तावना:**

प्राथमिक ते माध्यमिक शिक्षण हा विद्यार्थी जीवनातील अत्यंत महत्त्वाचा टप्पा असतो. या कालावधीत विद्यार्थ्याच्या शैक्षणिक प्रगतीसोबतच त्याच्या वैयक्तिक, सामाजिक आणि नैतिक विकासावर भर दिला जातो. प्राथमिक स्तरावर भाषिक कौशल्य, गणिताचे प्राथमिक ज्ञान आणि परिसराची ओळख या गोष्टी शिकविल्या जातात. माध्यमिक स्तरावर विज्ञान, पर्यावरण, इतिहास, भूगोल यांसारख्या विषयांच्या माध्यमातून विद्यार्थ्यांचे विश्लेषणात्मक विचार, सामाजिक जाणीवा आणि नैतिक मूल्यांची पायाभरणी केली जाते.मात्र, या सर्वांबरोबरच अत्यंत महत्त्वाचा असा करिअर किंवा व्यावसायिक क्षेत्रातील विचार शालेय स्तरावर फारसा केला जात नाही. आज

अनेक विद्यार्थी दहावी उत्तीर्ण केल्यानंतर कोणता अभ्यासक्रम निवडायचा, याबाबत गोंधळलेले असतात. काही वेळा ते पालक, शिक्षक, नातेवाईक किंवा समाजाच्या प्रभावाखाली निर्णय घेतात. अशा निर्णयांचा आधार स्वतःची आवड, क्षमता, आणि संभाव्य संधी न घेता घेतला जातो.नंतर काही काळाने अशा विद्यार्थ्यांना त्यांच्या चुकीच्या निवडीची जाणीव होते, पण तेव्हा वेळ निघून गेलेली असते. परिणामी, काही विद्यार्थ्यी स्वत ला समायोजित करतात परंतु अनेकजण नापसंतीच्या अभ्यासक्रमात अडकतात, करिअरमध्ये अपयश येते किंवा मानसिक तणाव निर्माण होतो.यासाठी आवश्यक आहे की, करिअर मार्गदर्शनाची प्रक्रिया इयत्ता आठवी ते दहावी या काळातच सुरू झाली पाहिजे. विद्यार्थ्यांना विविध अभ्यासक्रम, त्यातील करिअर संधी, आवश्यक कौशल्ये, भविष्यातील मागणी यांची माहिती मिळाली पाहिजे. त्यांच्यावर अभिरुची चाचण्या, व्यक्तिमत्त्व चाचण्या, कार्यशाळा आणि उद्योग तज्ज्ञांचे व्याख्यान यांचा प्रभाव पडला पाहिजे. तसेच, पालकांसाठी देखील मार्गदर्शन सत्र आयोजित केली पाहिजेत. बरेचदा पालक आपल्या मुलांच्या अंतर्गत क्षमता आणि स्वारस्य ओळखण्यात चुकतात. त्यामुळे शाळांनी पालकांना मार्गदर्शन करून त्यांना त्यांच्या मुलांना समजून घेण्यास मदत करणे गरजेचे आहे. शाळांनी केवळ परीक्षाभिमुख शिक्षण न देता, विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष आयुष्याच्या दिशा देणारे शिक्षण द्यावे. त्यांच्या आत्मभानाला जागं करत, त्यांना त्यांच्या आवडीच्या, योग्य आणि योग्यतेनुसार वाटचाल करता यावी यासाठी प्रयत्न करावेत. शेवटी, विद्यार्थ्यांचे करिअर हे केवळ निकालावर आधारित नसून, त्यांच्या स्वभाव, क्षमतांवर आधारित असते. त्यामुळे दहावीपूर्वीच त्यांच्या विकासासाठी सजगपणे पावले उचलणं काळाची गरज आहे.

**उद्दिष्ट:** विद्यार्थ्यांच्या विविध व्यावसायिक पदवी अभ्यासक्रम निवडी मागील कारणाचा अभ्यास करणे.

**संशोधन कार्यपद्धती :**

| | |
|---|---|
| **संशोधन पद्धती** | वर्णनात्मक संशोधन पद्धतीतील सर्वेक्षण पद्धती |
| **जनसंख्या** | शिरपूर तालुक्यातील सर्वे व्यावसायिक अभ्यासकमाला प्रवेशित विद्यार्थी |
| **न्यादर्श** | संशोधकांनी स्वनिर्मित काही विधानाची प्रश्नांवली व्यावसायिक अभ्यासकमाला प्रवेशित विद्यार्थ्यांच्या प्रवेशित गटाला देण्यात आली होती. प्रतिसाद नोंदविणारे एकूण 227 विद्यार्थी होते. तेच संशोधनाचे नमुना म्हणून निवड करण्यात आली होती. |
| **साधने** | संशोधकाची स्वनिर्मित काही विधानाची प्रश्नावली होती. विधाने –05, मिश्र विधाने. |
| **संख्याशास्त्रीय परिमाणे** | टक्केवारी |


**संकलित माहितीचे विश्लेषण:** प्रस्तुत संशोधनात संशोधकाने व्यावसायिक अभ्यासक्रमासास प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांना काही विधानाची प्रश्नावली दिली होती. त्या विधानांना विद्यार्थ्यांनी दिलेल्या प्रतिसादांचे विश्लेषण

खालील प्रमाणे केले आहे.

### 01. तुम्ही कोणता व्यावसायिक अभ्यासक्रमास प्रवेश घेतला आहे.

**तक्ता क्रमांक 01**

| अ. नं. | अभ्यासक्रम | प्रतिसाद | टक्केवारी |
|---|---|---|---|
| ०१ | मेडिकल अभ्यासक्रम | 23 | 10 |
| ०२ | अभियांत्रिकी अभ्यासक्रम | 45 | 20 |
| ०३ | औषधनिर्माणशास्त्र अभ्यासक्रम | 54 | 24 |
| ०४ | मॅनेजमेंट अभ्यासक्रम | 20 | 09 |
| ०५ | कायदा अभ्यासक्रम | 22 | 10 |
| ०६ | बी.एड. अभ्यासक्रम | 53 | 23 |
| ०७ | इतर | 10 | 04 |
| | **एकूण** | 227 | 100 |





- **निरीक्षण व निष्कर्ष:** तक्ता क्रमांक ०१ नुसार व्यावसायिक अभ्यासक्रमांमध्ये प्रवेश घेतलेल्या एकूण 227 विद्यार्थ्यांनी प्रतिसाद नोंदविला आहे. त्यात औषधनिर्माणशास्त्र अभ्यासक्रमातील 24% विद्यार्थी आहेत. बी.एड. अभ्यासक्रमातील 23% विद्यार्थी आहेत. अभियांत्रिकी अभ्यासक्रमातील 20% विद्यार्थी आहेत, मेडिकल आणि कायदा अभ्यासक्रमांतील अनुक्रमे 10%-10% विद्यार्थीआहेत. मॅनेजमेंट अभ्यासक्रमातील

09% विद्यार्थी आहेत. तर इतर अभ्यासक्रमांतील 04% विद्यार्थी आहेत.

### 02. हा अभ्यासक्रम निवडीमागील प्रमुख कारण कोणते?

**तक्ता क्रमांक 02**

| अ. नं. | विधाने | प्रतिसाद | टक्केवारी |
|---|---|---|---|
| 01 | मी हा अभ्यासक्रम माझ्यामुळे निवडला आहे | 52 | 23 |
| 02 | पालकांच्या सल्ल्यानुसार हा अभ्यासक्रम निवडला | 31 | 14 |
| 03 | या क्षेत्रात चांगल्या नोकरीच्या संधी आहेत. | 21 | 09 |
| 04 | मित्रमंडळीच्या प्रभावामुळे मी निवड केली आहे. | 10 | 05 |
| 05 | समाजात या व्यवसायाला प्रतिष्ठा आहे. | 10 | 04 |
| 06 | या क्षेत्रात भविष्यात स्थिरता आणि सुरक्षितता आहे. | 33 | 15 |
| 07 | शाळा/कॉलेज मधील करिअर मार्गदर्शनाने मला मदत केली | 32 | 14 |
| 08 | सोशल मिडिया किंवा इंटरनेटचा प्रभाव होता. | 12 | 05 |
| 09 | प्रवेश घेण्यासाठी प्रवेश परीक्षा सहज होती. | 12 | 05 |
| 10 | मी दुसरा पर्याय न मिळाल्यामुळे हा अभ्यासक्रम घेतला. | 14 | 06 |
| | **एकूण** | 227 | 100 |




- **निरीक्षण:** तक्ता क्रमांक ०२ नुसार, सर्वात जास्त (23%) विद्यार्थ्यांनी स्वतःच्या आवडीमुळे अभ्यासक्रम निवडला आहे. पालकांचा सल्ला (14%) आणि शाळा/कॉलेजमधील करिअर मार्गदर्शन (14%) हे देखील महत्त्वाचे कारणे आहेत. भविष्यात स्थिरता आणि सुरक्षितता असण्यामुळे 15% विद्यार्थ्यांनी अभ्यासक्रम निवडला आहे. नोकरीच्या चांगल्या संधी (9%) आणि दुसरा पर्याय न मिळाल्यामुळे (6%) देखील काही विद्यार्थ्यांनी अभ्यासक्रम निवडला. मित्रमंडळी, समाजातील प्रतिष्ठा, सोशल मीडिया, आणि प्रवेश परीक्षेची सहजता या कारणांचा प्रभाव तुलनात्मकरीत्या कमी आहे (4-5%).
- **निष्कर्ष:** विद्यार्थ्यांची स्वयंपराधीनता आणि स्वतःच्या आवडीचा प्रभाव अभ्यासक्रम निवडीत सर्वाधिक आहे. पालकांचा सल्ला आणि शाळेतील करिअर मार्गदर्शन हे विद्यार्थी निवडीमध्ये महत्त्वपूर्ण भूमिका बजावतात. भविष्यातील सुरक्षितता आणि स्थिरतेचा विचार करणे विद्यार्थी आणि त्यांचे पालक यांना आवडते. नोकरीच्या संधी विद्यार्थ्यांच्या निवडीत प्रभावित असले तरी ते मुख्य कारण नाही. काही विद्यार्थी दबावाखाली किंवा पर्याय न मिळाल्यामुळे अभ्यासक्रम स्वीकारत आहेत, हे लक्षात घेण्याजोगे आहे. सोशल मीडिया आणि मित्रमंडळीचा प्रभाव तुलनात्मकरीत्या कमी आहे, पण तरीही काही प्रमाणात आहे.

03. **भविष्यात जर संधी मिळाली तर अभ्यासक्रम बदलून घ्यावा असे वाटते:**

**तक्ता क्रमांक 03**

| अ. नं. | पर्याय | प्रतिसाद | टक्केवारी |
|---|---|---|---|
| 01 | सहमत | 94 | 41 |
| 02 | असहमत | 85 | 37 |
| 03 | सांगता येत नाही | 51 | 22 |
| | एकूण | 227 | 100 |




- **निरीक्षण:** तक्ता क्रमांक ०३ नुसार 41% विद्यार्थी भविष्यात संधी मिळाल्यास अभ्यासक्रम बदलण्यास सहमत आहेत. 37% विद्यार्थी अभ्यासक्रम बदलण्यास असहमत आहेत, म्हणजे त्यांना सध्या निवडलेला अभ्यासक्रम योग्य वाटतो. 22% विद्यार्थ्यांना या प्रश्नावर ठोस मत सांगता आलेले नाही, म्हणजे ते नक्की ठरवू शकले नाहीत.
- **निष्कर्ष:** जवळजवळ अर्धे विद्यार्थी भविष्यात संधी मिळाल्यास अभ्यासक्रम बदलण्यास तयार आहेत, याचा अर्थ त्यांना त्यांच्या करिअरमध्ये बदल करण्याची शक्यता आहे. मात्र, 37% विद्यार्थी सध्या निवडलेल्या अभ्यासक्रमाबाबत नक्की आणि समाधानी आहेत, आणि बदल करू इच्छित नाहीत. काही विद्यार्थी (22%) अजूनही नक्की निर्णय घेतलेले नाहीत, त्यामुळे त्यांच्यासाठी करिअर मार्गदर्शन आणि माहिती अधिक आवश्यक आहे.

04. **तुम्हाला सध्या निवडलेल्या अभ्यासक्रमामुळे नोकरी मिळण्याबाबत काही चिंता किंवा भीती वाटते:**

**तक्ता क्रमांक 04**

| **अ. नं.** | **पर्याय** | **प्रतिसाद** | **टक्केवारी** |
|---|---|---|---|
| 01 | सहमत | 119 | 52 |
| 02 | असहमत | 56 | 25 |
| 03 | सांगता येत नाही | 52 | 23 |
| | **एकूण** | 227 | 100 |




- **निरीक्षण:** 52% विद्यार्थी सध्या निवडलेल्या अभ्यासक्रमामुळे नोकरी मिळण्याबाबत चिंता किंवा भीती व्यक्त करत आहेत. 25% विद्यार्थी या बाबतीत चिंतामुक्त आहेत, म्हणजे त्यांना नोकरीच्या संदर्भात चिंता नाही. 23% विद्यार्थ्यांना नक्की सांगता येत नाही, कदाचित ते अजून ठराविक निर्णय घेऊ शकलेले नाहीत.
- **निष्कर्ष:** नोकरी संदर्भातील चिंता ही विद्यार्थ्यांमध्ये एक मोठा मुद्दा आहे, कारण जवळजवळ अर्ध्याहून

अधिक (52%) विद्यार्थी याबाबत चिंतित आहेत. काही विद्यार्थी (25%) समाधानी आहेत आणि त्यांना नोकरी मिळण्याबाबत विश्वास आहे. 23% विद्यार्थी अजून निश्चिंत नाहीत, ज्यांना मार्गदर्शनाची गरज आहे. या चिंतेमुळे करिअर बदलण्याचा विचार करणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या वाढू शकते.

**प्रमुख निष्कर्ष:**

1. विद्यार्थ्यांच्या अभ्यासक्रम निवडीवर स्वतःची आवड आणि स्वयंपर निर्णय सर्वात प्रभावी घटक आहेत, परंतु पालकांचा सल्ला आणि शाळेतील करिअर मार्गदर्शन यांचाही महत्त्वाचा वाटा आहे.
२. जवळपास 50% विद्यार्थी भविष्यात अभ्यासक्रम बदलण्यास तयार आहेत, याचा अर्थ अनेक विद्यार्थी सध्याच्या अभ्यासक्रमावर संपूर्ण समाधानी नाहीत आणि त्यांना योग्य मार्गदर्शनाची आवश्यकता आहे.
३. फक्त 37% विद्यार्थीच आपल्या सध्याच्या अभ्यासक्रमाबाबत निश्चित आणि समाधानी आहेत, तर उर्वरित विद्यार्थ्यांपैकी काही अजूनही निर्णय घेण्यात असमर्थ आहेत, जे करिअर मार्गदर्शनाच्या गरजेचे स्पष्ट संकेत आहेत.
4. नोकरी संदर्भातील चिंता ही विद्यार्थ्यांमध्ये एक मोठा मुद्दा आहे, कारण जवळजवळ अर्ध्याहून अधिक (52%) विद्यार्थी याबाबत चिंतित आहेत. काही विद्यार्थी (25%) समाधानी आहेत आणि त्यांना नोकरी मिळण्याबाबत विश्वास आहे.

**चर्चा**: जवळ-जवळ निम्मे विद्यार्थी सध्या घेतलेला व्यावसायिक अभ्यासक्रम बदलण्यास इच्छुक असून, 22% विद्यार्थी अजूनही निर्णयाच्या अनिश्चित अवस्थेत आहेत. यावरून असे स्पष्ट होते की शाळा आणि उच्च माध्यमिक स्तरावर आजही करिअर मार्गदर्शनाचा अभाव आहे. विद्यार्थ्यांना विविध अभ्यासक्रमांचे स्वरूप, त्यामधील संधी व आव्हाने, आणि त्यांच्या व्यक्तिमत्त्वाशी सुसंगत करिअर पर्याय याबाबत योग्य माहिती देणे गरजेचे आहे. अधिकतर विद्यार्थ्यांनी स्वतःच्या अभिरुचीनुसार अभ्यासक्रमांची निवड केलेली दिसून येते, ही निश्चितच सकारात्मक बाब असली तरी, अशा निवडी अधिक सुजाण व माहितीपूर्ण व्हाव्यात यासाठी शालेय स्तरावरूनच योग्य मार्गदर्शन मिळणे अत्यावश्यक आहे. शिक्षणसंस्थांनी विद्यार्थ्यांना विविध अभ्यासक्रमांचे प्रत्यक्ष अनुभव, उद्योगतज्ज्ञांचे संवाद, इंटर्नशिप संधी आणि वैयक्तिक सल्ला मिळवून देण्यासाठी ठोस व कार्यक्षम करिअर काउंसलिंग सेल स्थापन करावेत. दरवर्षी किमान दोन वेळा व्यावसायिक करिअर मार्गदर्शन शिबिरांचे आयोजन करावे. ही शिबिरे केवळ माहितीपर नसून, विद्यार्थ्यांच्या वैयक्तिक गरजांवर आधारित, मनोवैज्ञानिक चाचण्या आणि SWOT विश्लेषणावर आधारित असावीत. विद्यार्थ्यांच्या निर्णयांवर पालकांचा प्रभाव दिसून येत आहे. त्यामुळे पालकांसाठी सुद्धा मार्गदर्शन सत्रांचे आयोजन करणे आवश्यक आहे, जेणेकरून ते आपल्या पाल्यांच्या निवडीला योग्य प्रकारे पाठिंबा देतील आणि त्यांच्यावर अनावश्यक दबाव आणणार नाहीत. अनेक विद्यार्थी प्रवेश घेतल्यानंतर ही अभ्यासक्रम बदलण्यास इच्छुक दिसून येत आहेत, त्यामुळे शैक्षणिक संस्थांनी अभ्यासक्रमांमध्ये बदलाची लवचिकता ठेवणे गरजेचे आहे.

यामुळे विद्यार्थ्यांना त्यांच्या आवडी-निवडींनुसार योग्य दिशा निवडता येईल. विद्यार्थ्यांनी निवडलेला अभ्यासक्रम हा त्यांच्या भविष्यातील करिअर घडवणारा महत्त्वाचा निर्णय असतो. त्यामुळे शाळा, महाविद्यालय, पालक आणि शासन यांची एकत्रित जबाबदारी आहे की, विद्यार्थ्यांना योग्य मार्गदर्शन, माहिती आणि भावनिक आधार मिळावा. योग्य दिशादर्शन झाल्यास, विद्यार्थी अधिक आत्मविश्वासाने आणि तयारीने आपले भवितव्य घडवू शकतात.

**संदर्भग्रंथ सूची :**


1. Gorlitz, K., & Gravert, C. (2018). The effects of a high school curriculum reform on university enrollment and the choice of college major. *Education Economics*, *26*(3), 321-336.
2. Murphy, M. J., Seneviratne, R. D., Cochrane, L., Davis, M. H., & Mires, G. J. (2013). Impact of student choice on academic performance: cross-sectional and longitudinal observations of a student cohort. *BMC Medical Education*, *13*(1), 26.
3. आगलावे, प्रदीप. (2000). संशोधन पध्दतीशास्त्र व तंत्रे, नागपूर: विद्या प्रकाशन.
4. घोरमोडे, के. यु., घोरमोडे, कला, (2008). शैक्षणिक संशोधनाची मूलतत्वे, नागपूर: विद्या प्रकाशन.
5. भितांडे, वि. रा. (२००७). शैक्षणिक संशोधन पद्धती. (प्रथमआवृत्ती). पुणे: नित्य नूतन प्रकाशन.
6. मुळे व उमाठे. (१९९८). शैक्षणिक संशोधनाची मुलतत्वे. (तिसरी आवृत्ती). नागपूर: विद्या बुक्स प्रकाशन.